वर्ष-०८ | अंक-२९ | मुंबई, मंगळवार ०७ ते १३ जून - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
जुहू बलात्कार आणि हत्येप्रकरणी आरोपीला फाशी, 'साकीनाका'नंतर आता 'जुहू' प्रकरणी दिंडोशी न्यायालयाचा निकाल

3 → पावसाळ्यातील आजारांना तोंड देण्यासाठी ग्रामीण आरोग्य यंत्रणा सज्ज

तीनशे रुपयांवरुन सुरु झाला दोघात वाद; मध्यस्थीसाठी गेलेल्या तिसऱ्याच्याच झाला घात ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in | policebatmipatra@gmail.com | FOLLOW US! https://policebatmipatra.page

# पोटच्या दोन मुलांचा खून केला, व्हिडीओ रेकॉर्ड करुन दुसऱ्या पत्नीला पाठवला;

## पश्चिम बंगालमधल्या आरोपीला मुंबईत बेड्या




मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रांच युनिट-7 ने अशा व्यक्तीला अटक केली आहे, ज्याने आपल्या दहा वर्षाच्या मुलाचा आणि 12 वर्षाच्या मुलीचा गळा आवळून हत्या केली होती. खुदाबक्ष इमरान शेख असं अटक केलेल्या आरोपीचं नाव असून त्याने 26 मे रोजी पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये आपल्या दोन मुलांची हत्या केली होती. हत्या केल्यानंतर तिथून पळ काढून आरोपी मुंबईत लपला होता. इतकंच नाही तर दोन्ही मुलांचा खून केल्यानंतर आरोपीने त्यांचा व्हिडीओ रेकॉर्ड करत दुसऱ्या पत्नीला पाठवले होते. पत्नीच्या तक्रारीनंतर गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खुदाबक्ष इम्रान शेख (30) असे आरोपीचे नाव असून ती पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील रहिवासी आहे. शेखने अल्पवयीन असताना लग्न केली. त्याला 10 वर्षांचा मुलगा अलीम आणि 12 वर्षांची मुलगी रीना अशी दोन अपत्ये आहेत. आरोपी शेखने तीन लग्ने केली. या दोन अपत्यांची आई आणि त्याच्या पहिल्या पत्नीचा ठावठिकाणा माहित नाही. आरोपी दुसरी आणि मुलांसोबत राहत होता. त्याने नुकतंच तिसर लग्न केलं. यावरुन त्याची दुसरी पत्नी आणि त्याच्यामध्ये वारंवार भांडणं होत असतं. यामध्ये दोन्ही मुलंही भरडली जात होता. आरोपी पत्नीला मारहाण करुन तिचा छळ करायचा. नेहमीच्या भांडणामुळे खुदाबक्ष शेख वैतागला होता. 26 मे रोजी पुन्हा भांडण झाल्यावर त्याने रागाच्या भरात मुलांचा गळा आवळून त्यांचा खून केला, अशी माहिती युनिट 7 चे पोलिस निरीक्षक सुधीर जाधव यांनी दिली.

मुलांचा खून करुन आरोपी शेख थांबला नाही. त्याने मृत मुलांचे फोटो घेऊन, त्यांचे व्हिडीओ बनवून पत्नीला पाठवले. यानंतर त्याने घटनास्थळावरुन पळ काढला. शेख मुंबईत आला आणि मुलुंडमध्ये त्याच्या मित्राकडे राहू लागला. मित्राने त्याला बिल्डरच्या ठिकाणी नोकरीही दिली, असं एका पोलीस अधिकाऱ्याने ...पान २ वर...

## कौटुंबिक वादातून तहसीलदार बहिणीवर सख्ख्या भावाचा जीवघेणा हल्ला, बीडमधील केज येथील घटनेने खळबळ

बीडच्या केज तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार आशा वाघ यांच्यावर कौटुंबिक वादातून त्यांच्या सख्ख्या भावानेच कार्यालयात घुसून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मधुकर वाघ असे हल्ला करणाऱ्या भावाचे नाव आहे. मधुकर याने कोयत्याने आशा यांच्या मानेवर आणि डोक्यात वार केले आहेत. या हल्ल्यात नायब तहसीलदार आशा वाघ या गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेनंतर जखमी झालेल्या आशा वाघ यांना




अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. परंतु, त्यांच्या डोक्याला आणि मानेला गंभीर जखमा झाल्या असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. केज येथील महसूल विभागात कार्यरत असलेल्या नायब तहसीलदार आशा वाघ आणि त्यांचा सख्खा भाऊ मधुकर दयाराम वाघ यांच्यात गेल्या काही दिवसांपासून शेतीच्या कारणावरून वाद सुरू आहे. मधुकर ...पान २ वर...

## बहिणीला सतत मारहाण करणाऱ्या भावोजीची मेहुण्याकडून हत्या; खून करुन मृतदेह...

औरंगाबाद शहरातील हिमायतबाग कट्टा परिसरातील डोंगराच्या पायथ्याशी आढळून आलेल्या मृतदेहाचा खुलासा झाला असून, बहिणाला सतत मारहाण करणाऱ्या भावोजीची मेहुण्याकडून हत्या करण्यात आल्याच पोलीस तपासात



समोर आले आहे. हिमायतबाग परिसरात काल एक मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळून आला होता. त्यांनतर वरिष्ठ पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन अधिक तपास करत अवघ्या एक दिवसात आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. सुधाकर नारायण चिपटे (43, रा. सांगले कॉलनी) असे मृताचे नाव असून, राजेश संतोष मोळवड़े असे आरोपीचे नाव आहे.

सुधाकर चिपटे एका खाजगी वाहनावर चालक म्हणून काम करायचा. त्याला दारूचे व्यसन असल्याने तो नेहमी दारू पिऊन पत्नीशी वाद घालून तिला मारहाण करायचा. दरम्यान सहा महिन्यापूर्वी राजेश मोळवडे बहिणीच्या शेजारीच भाड्याच्या घरात राहण्यासाठी आला होता. यावेळी बहिणीला भावोजीकडून सतत होणारी मारहाण पाहून त्याला प्रचंड राग यायचा. त्यामुळे त्याने भावोजीचा गेम करण्याचं ठरवलं. त्यानुसार शनिवारी रात्री घरी कोणी नसल्याची संधी पाहून राजेशने सुधाकर यांच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार केले. ज्यात सुधाकरचा जागीच मृत्यू झाला.

मृतदेह पोत्यात टाकून नेले...

राजेशने सुधाकरची हत्या केल्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी शक्कल लढवली. आधी सुधाकरचा मृतदेह पांढऱ्या गोणीत टाकले. त्यांनतर गोणीवर आणखी एक पोत चढवत मृतदेह मोपेडवरून घेऊन हिमायबागमध्ये पोहचला. मृतदेहाची ओळख पटू नयेत म्हणून पेटवून दिला. पण मध्यरात्री दीड ...पान २ वर...

## बंदुकीतुन हवेत गोळ्या झाडणाऱ्या 6 आरोपींना पोलिसांनी 24 तासाच्या आत पकडले



घोडबंदर :फायरींगच्या गुन्हयातील ६ आरोपींना २४ तासाच्या आत पकडण्यात गुन्हे शाखेस यश. मिळालेल्या माहिती नुसार फिर्यादी याने पोलिसांना माहिती दिल्यामुळे आरोपी यांनी मनात राग धरून दिनांक २/६/२०२२ रोजी रात्री १ च्या सुमारास आरोपी यांनी एक मोटार सायकल व चारचाकी वाहनातुन फिर्यादी यांचा पाठलाग केला त्यांना घाबरून फिर्यादी आडोश्याला लपून राहीले . ती मोटार सायकल व चारचाकी वाहन पुढे गेल्यानंतर वैभव शेठच्या कंपनीजवळ, घोडबंदर या ठिकाणी आरोपीयांनी बंदुकीतुन दोन गोळया हवेत फायर केल्या म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्यातक्रारी वरुन काशिमिरा पोलीस ठाण्यात दिनांक ३/०६/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन व वरीष्ठ अधिका-यांना गुन्हयाबाबत माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पथके तयार करण्यात आली. सदर गुन्हयाचा घटनास्थळी तात्काळ भेटी देऊन तांत्रिक विश्लेषन व गोपनीय बातमीदार यांच्या कडून आरोपींची ओळख पटवून त्यांचा शोध सुरु करण्यात आला. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेतील तपास पथकाने आरोपींचा ठावठिकाणाबाबत माहीती प्राप्त करुन त्या आधारे १) विशाल ऊर्फ गचक्या वेल्दा मुत्तुस्वामी, वय. २० वर्ष, रा. दहिसर पुर्व, मुंबई, २) राहुल ऊर्फ बॉक्सर शिवनाथ विश्वकर्मा, वय. २७ वर्ष, रा. दहिसर पुर्व, मुंबई, ४) अनुराग दिपक म्हात्रे, वय २० वर्षे, रा.मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे ५) अभिजीत सुधाकर पाष्टे, वय २८ वर्षे, विरार पुर्व. यांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातुन ०१ गावठी बनावटीचे पिस्टल, ०२ मॅग्झीन, ०५ जिवंत काडतुसे तसेच गुन्हा करतांना वापरण्यात आलेली होन्डा कंपनीची आय-२० चार चाकी वाहन जप्त करण्यात आलेले आहे. तसेच गुन्हे शाखा - १ यांचे तपास पथकाने आरोपी विकास ऊर्फ विकी राजु निणानिया, वय. ३० वर्ष, रा. मनवेल पाडा, विरार पुर्व यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून डयुक कंपनीची गुन्हयात वापरलेली मोटार सायकल हस्तगत केलेली आहे. अशाप्रकारे २४ ...पान २ वर...

## मोबाइल दुकान फोडत चोरट्यांनी केला दहा लाखांचा ऐवज लंपास



सोलापूर - सोलापूर पोलीस आयुक्त म्हणून सुधीर हिरेमठ हे नुकतेच रुजू झाले आहेत. त्यांकडे तात्पुरत्या स्वरूपात पदभार देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र नव्या पोलीस आयुक्तांसमोर चोरट्यांनी नवे आवाहन उभे केले आहे. सोलापूर शहरात मध्यभागी असलेल्या चौपाड येथील एस.एस. कम्युनिकेशन हे मोबाइल दुकान फोडून जवळपास दहा लाखांचा मुद्देमाल लंपास केला आहे. यामध्ये साडे आठ लाखांचे स्मार्ट मोबाइल व दीड लाखांची रोखडचा समावेश आहे. ही घटना सोमवारी पहाटे 3 वाजण्याच्या सुमारास घडली आहे. पोलिसांचे पथक सोमवारी सकाळी पोहोचले असून पंचनामा, डॉग स्क्वाड आदी, फिंगर प्रिंट आदी कामकाज करत तपास सुरू केला आहे. चोरीची सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. यात चोरट्यांचा चेहरा स्पष्टपणे दिसत आहे. दुकानाचे मालक विशाल अहुजा यांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी सोलापूर शहर पोलिसांना माहिती दिली आहे.चोरीची घटना सीसीटीव्हीत कैद : तीन चोरटे हे लोखंडी कटावणीच्या साहायाने शटर उचकटून मोबाइल दुकानात शिरले. कॅश काऊंटरकडे जाऊन रोखड घेण्यासाठी धडपड करत आहेत. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. कॅश काउंटरचे ड्रॉ देखील लोखंडी कटावणीच्या साहायाने तोडून रोखड लंपास केली आहे. यामध्ये चोरट्यांचा चेहरा स्पष्ट दिसत आहे.

## भाईदर पश्चिम परिसरात हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा - १२ जण ताब्यात

भाईंदर : घरगुती हुक्का पार्लरवर दिनांक ६/०६/२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर पथकाची संयुक्तरित्या कारवाई केली आहे.



दिनांक ०४.०६.२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती कि करण जोशी हा रुम मध्ये जी/०८ सिध्दार्थ को. ऑ. सोसायटी, भाईंदर पश्चिम याठिकाणी हा तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का उपलब्ध करुन देत असून ग्राहकांना हुक्का पुरवित आहे.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. देविदास हंडोरे यांनी वरिष्ठांना माहिती देवून पुर्तता करुन सदर ठिकाणी पंच व पोलीस पथकासह दिनांक ०४/०६/२०२२ रोजीछापा टाकला असता सदर ठिकाणी कोणताही परवाना न घेता रुममध्ये १) करण भरत जोशी, याने नियोजन करुन त्याच्यासोबत वेटर म्हणुन काम करणारे २) रॉकी राज शर्मा, ३) जिग्नेश विनोदभाई शहा, ४) बिल्ला सलीम अन्सारी, व ५) सुरज राजेश पुजारी याच्याबरोबर रुममध्ये ग्राहकांना तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत हुक्का उपलब्ध करुन देवुन सदर रुममध्ये हुक्का पुरवितांना पोलिसांना मिळून आले . पोलिसांनी कारवाई दरम्यान एकुण ७ ग्राहक हुक्का पित असताना मिळुन आले. पोलिसांनी तंबाखुमिश्रीत प्रतिबंधीत फ्लेवर व हुक्क्याचे साहित्य असा एकुण ११,२८३/- रुपयाचा मुद्देमालासह सर्वांना ताब्यात घेतले असून सदर आरोपींविरुध्द पोहवा/अजय सपकाळ यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन भाईंदर पोलीस ठाणे येथे सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने यांचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यावर निर्बंध अधिनियमाद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय. ..पान २ वर...

## लग्नाला विरोध असल्याने मुलाने केला आईचा खून, तिघांना अटक




मुंबई - आपले लग्न होऊ नये म्हणून काळा जादू करत असल्याच्या संशयावरून पोटच्या मुलाने आईची हत्या केल्याची घटना वडाळा परिसरातील पंचशिलनगर आनंदवाडी येथे शनिवारी (दि. 4 जून) रात्रीच्या सुमारास घडली आहे. निर्मला विजय ठाकूर (वय 42 वर्षे ), असे मृत आईचे नाव आहे. तक्रारीनंतर 12 तासामध्ये पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. वडाळा पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, मोठा मुलगा अक्षय विजय ठाकूर (वय 25 वर्षे) याचे कोमल दत्तात्रेय भोईलकर (वय 22 वर्षे ) मुलीशी प्रेम आहे. हे दोघे लग्नही करणार होते. मात्र, दोघांच्या लग्नाला आईचा विरोध आहे आणि लग्न होऊ नये म्हणून आईकडून काळा जादू आणि करणे करण्यात येत असलेल्या संशयावरून मोठा मुलगा अक्षय, प्रेयसी कोमल आणि अक्षयचा लहान भाऊ यांनी मिळून हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. पोलिसांना मिळालेल्या तक्रारीनंतर वडाळा पोलिसांनी कलम 302 नुसार गुन्हा दाखल केला असून तिन्ही आरोपींना 24 तासांचे आत खुनाच्या आरोपाखाली अटक केली आहे. सोमवारी (दि. 6 जून) न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे.

## अश्लील व्हिडीओ कॉल करुन खंडणी मागणाऱ्या महिलेसह पोलीस कर्मचारी व तथाकथीत पत्रकाराला अटक

नंदुरबार : दिनांक : ३१/५/२०२२ रोजी म्हसावद ता. शहादा येथील एक ४३ वर्ष नोकरदार इसम हा घाबरलेल्या अवस्थेत नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. पी.आर.पाटील यांना भेटण्यासाठी आला होता प्रथम तो काहीही बोलण्याच्या मनस्थितीत नव्हता. परंतु पोलीस अधीक्षक श्री. पी.आर.पाटील यांनी त्यांची विचारपूस केली त्यावेळी त्याने सांगितले कि दिनांक ९/४/२०२२ सकाळच्या दरम्यान त्याला एका अनोळखी महिलेने फोन केला व स्वत:ची ओळख न देता बोलू लागली. त्यानंतर ती महिला तक्रारदार यास वारंवार फोन करु लागली. काही दिवसांनी त्या अनोळखी महिलेने तक्रारदार यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली परंतु तक्रारदाराने त्या महिलेस भेटण्यास नकार दिला. त्यामुळे त्या महिलेने तक्रारदार यांना व्हिडीओ कॉल करून



अश्लील चाळे करू लागली व त्याचा व्हिडीओ तयार करुन घेतला व तक्रारदार यास सुरुवातीस सदर घटनेचे कोणतेही गांभीर्य वाटले नाही परंतु सदर महिलेने दुसऱ्या दिवसापासून तिचे खरे स्वरुप दाखविण्यास सुरुवात केली. दुसऱ्या दिवशी तक्रारदार यास त्याचे ओळखीचा पोलीस छोटु शिरसाठ याने फोन करुन बदनामी करण्याची भिती दाखवून मध्यस्थी करण्यास सुरुवात केली. तसेच तक्रारदार यास प्रचंड मानसिक त्रास देवून तसेच त्याची बदनामी करण्याची भिती दाखवून १४ लाख रुपयांची मागणी केली परंतु तक्रारदार यांची पैसे देण्याची इच्छा नसतांना देखील सामाजीक प्रतिष्ठा व बदनामीच्या भितीने तसेच व्हिडीओ कॉलची असलेली क्लीप नष्ट करण्याच्या अटीवर छोटु शिरसाठ पोलीस याचे मार्फतीने तक्रारदार याने सदर महिलेस ९ लाख रुपये दिले.परंतु काही दिवसांनी एक तथाकथीत पत्रकार देखील तक्रारदार यास पुन्हा ९ लाख रुपयांची मागणी करू लागला त्यावेळी त्यांनी पोलीस कर्मचारी छोटु शिरसाठ यांस विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली त्याकारणास्तव तक्रारदार याच्या एका मित्राने त्यास नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.पी.आर.पाटील यांना भेटण्यास सांगून ते न्याय देतील असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार हा मा.पोलीस अधीक्षक कार्यालय, नंदुरबार येथे आला होता.

सदरची घटना अतिशय गंभीर होती. तसेच तक्रारदार हा आत्माहत्या करण्याच्या परिस्थितीत पोहोचल्याचे त्याच्या मनस्थितीवरुन नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. पी.आर.पाटील ...पान २ वर...

## अडीच वर्षाच्या चिमुकल्याची विक्री करण्याच्या प्रयत्न, पाच जणांना अटक



कोल्हापूर - अडीच वर्षाच्या बाळाच्या विक्रीच्या प्रयत्नात असलेल्या पाच जणांना हातकणंगले पोलिसांनी सापळा रचून पकडले आहे. हातकणंगले बसस्थानक परिसरात ही घटना घडली. यातील एक आरोपी पळून गेला असून पोलीस त्याचाही शोध घेत आहेत. दरम्यान, यातील संशयित आरोपींनी यापूर्वीही अशाप्रकारे काही मुलांची विक्री केली आहे का याचाही पोलीस शोध घेत आहेत. सापळा रचून केली कारवाई - पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हातकणंगले येथील बसस्थानक परिसरात अडीच वर्षाच्या बालकाची विक्री करण्यासाठी काही लोक येणार असल्याची गोपनिय माहिती हातकणंगले पोलिसांना मिळाली ...पान २ वर...

# जुहू बलात्कार आणि हत्येप्रकरणी आरोपीला फाशी, 'साकीनाका'नंतर आता 'जुहू' प्रकरणी दिंडोशी न्यायालयाचा निकाल



मुंबई: मुंबईतील दिंडोशी सत्र न्यायालयाकडून सलग दुसऱ्या दिवशी फाशीचा आणखीन एक निर्णय देण्यात आला आहे. सन 2019 च्या जुहू बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आला. जुहूमध्ये एका नऊ वर्षीय बालिकेचं अपहरण झाल्यानंतर तिची हत्या झाली होती. प्रकरणीच्या खटल्यावर आज निकाल देण्यात आला.

जुहूमध्ये 4 एप्रिल 2019 रोजी एका नऊ वर्षीय बालिकेचं अपहरण झाल्यानंतर तिचा मृतदेह एका गटारात सापडला होता. शवविच्छेदनात हत्येआधी बलात्कार झाल्याचं उघड झालं होतं. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी गुंडाप्पा चीनतंबी देवेंद्र याला अटक केली होती. आरोपीने त्या मुलीचं अपहरण करून तिच्यावर बलात्कार केला होता. नंतर त्या मुलीची हत्या करून तिचा मृतदेह गटारात फेकला होता.

ही धक्कादायक घटना उघडकीस आल्यानंतर जुहू परिसरातील लोकांनी मोठ्या प्रमाणात आंदोलन केलं होतं. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली. आरोपीला अटक केल्यानंतर त्याच्यावर पोक्सोसह आयपीसी कलम 302, 376, 363, 201 अंतर्गत दाखल करण्यात आला होता. साकीनाका बलात्कार आणि हत्येप्रकरणी आरोपीला फाशीची शिक्षा राज्याला हादरवून सोडणाऱ्या साकीनाका बलात्कार आणि हत्येप्रकरणी आरोपी मोहन चौहानला दिंडोशी सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. हे प्रकरण दुर्मिळातील दुर्मिळ असल्याचं सांगत राज्य सरकारच्या वतीने आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. वर्षाच्या आत खटल्याचा निकाल

या प्रकरणाचा जलद गतीने तपास करत केवळ एका वर्षाच्या याचा निकाल लावण्यात आला आहे. गणेश चतुर्थीच्याच दिवशी मुंबईत घडलेल्या साकीनाका बलात्कार प्रकरणानं संपूर्ण मुंबई हादरली होती. या प्रकरणातील नराधम मोहन चौहानला पोलिसांनी काही तासांतच अटक केली.

पीडितेला आणि तिच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठी हा खटला जलदगतीनं चालविण्यात येईल, असं आश्वासन खुद्द मुख्यमंत्र्यानी जनतेला दिलं होतं. त्यानुसार मुंबई पोलिसांनी अवघ्या 18 दिवसांत या प्रकरणाचा तपास पूर्ण करत आपलं आरोपपत्र दिंडोशी सत्र न्यायालयात दाखल केलं होतं. एकूण 346 पानांच्या या आरोपपत्रातील माहितीनुसार, पीडित महिला ही आरोपीला आधीपासूनच ओळखत होती. गुन्हा घडला त्याच्या 25 दिवस आधीही आरोपीनं महिलेला भेटण्याचा आणि संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. पण तो यशस्वी होऊ शकला नाही. त्यामुळेच बऱ्याच कालावधीनंतर ती त्याला भेटली तेव्हा रागाच्या भरात नराधमानं तिच्यासोबत हे अमानुष कृत्य केलं. यात लोखंडी सळीचाही त्यानं वापर केल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे.

# फरार आरोपीचा हल्ला, पोलीस अधिकाऱ्याच्या गोळीबारात आरोपी जखमी; लातूरमध्ये मध्यरात्री फिल्मी स्टाइल थरार

दोन महिन्यांपूर्वी चाकूर पोलीस कोठडीतून फरार झालेल्या आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यावरच आरोपीने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात पोलिसांनीही गोळी झाडल्याची घटना लातूर येथील श्रीनगर भागात घडली आहे. जखमी आरोपीवर उपचार सुरु आहेत. लातूर शहरात मध्यरात्रीच्या सुमारास ही थरारक घटना घडली. लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चापोली शिवारात जागेच्या वादातून सचिन दावणगावे या 26 वर्षीय तरुणाची धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणतील मुख्य आरोपी नारायण तुकाराम इरबतनवाड यास चाकूर पोलिसांनी अटक केली होती. मात्र चाकूर पोलिसांच्या हातावर तुरी देऊन मुख्य आरोपी पळून गेला होता. अनेक राज्यात तपास आरोपीच्या शोधासाठी पोलिसांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये शोध सुरू केला. त्याशिवाय, इतर राज्यातही तपास पथक पाठवले होते. चंदिगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगाना, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्यात शोध घेतला गेला. मात्र, आरोपी प्रत्येक ठिकाणावरुन पळून



जाण्यात यशस्वी होत होता. अनेक दिवस आरोपी फरार होता. शेवटी लातुरात सापडला पोलिसांनी मात्र आरोपीचा पाठपुरावा सोडला नाही. अखेर आरोपी लातूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्रीनगर भागात असल्याची माहिती मिळाली. आरोपी एका भाड्याच्या खोलीत राहत असल्याची गुप्त माहिती चाकूरचे तपास अधिकारी बालाजी मोहिते यांना मिळाली. त्यांनी पोलीस यंत्रणेला तसेच सहकाऱ्यांना कल्पना देऊन आरोपीचे घर गाठले. घरासमोर पोलीस आल्याचे समजताच आरोपी नारायण इरबतनवाड हा पळून जाण्याच्या तयारीत होता. नेमके काय घडले ? त्यावेळी एकटे अधिकारी असलेले बालाजी मोहिते आणि आरोपीची झटापट झाली. यात आरोपीने पोलीस अधिकारी मोहिते यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. आरोपी आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. पोलिस अधिकारी बालाजी मोहिते यांना मानेवर आणि इतर ठिकाणी जबर मार बसला. तसेच एका हाताने त्यांचा गळा आवळल्याने त्यांना त्रास होऊ लागला होता. याच वेळी आरोपीने मोहिते यांच्या कमरेला असलेले रिव्हॉल्वर घेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावेळी प्रसंगावधान राखून बालाजी मोहिते यांनी स्वसंरक्षणार्थ स्वतःच्या रिव्हॉल्वरमधून मुख्य आरोपी नारायण इरबतनवाड याच्या कमरेखाली गोळी झाडली. यात आरोपी हा गंभीर जखमी झाला. आरोपीवर लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. लातूरचे पोलिस अधीक्षक निखील पिंगळे यांनी सांगितले की, आरोपी हा अतिशय सराईत आणि गुंड प्रवृत्तीचा आहे. तो त्याच्या कोणत्या गुन्हेगारी नेटवर्कचा वापर करत होता यांची माहिती आम्ही मिळवत आहोत. या कारवाईतील पोलिस अधिकाऱ्याची प्रकृती बरी असून आरोपीवर उपचार सुरू आहेत. पुढील तपास पोलिस करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# पैसे दे नाहीतर तू 'गे' असल्याचा व्हिडिओ व्हायरल करु; तरुणाला धमकावून उकळले पैसे

पुणे : पुण्यात एका तरुणाला हनीट्रॅपमध्ये अडकवून त्याच्याकडून खंडणी उकळण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. हा विद्यार्थी मूळचा सांगलीचा असून तो एमबीएच्या दुसर्‍या वर्षाला आहे. फेसबुकच्या माध्यमातून एका तरुणासोबत त्याची ओळख झाली. एकेदिवशी त्याला फेसबुकवरील त्या मित्राने शरीर संबंध ठेवण्याची ऑफर दिली. सुरूवातीला त्याने नाही म्हटले. मात्र काही वेळानंतर त्याची ऑफर स्वीकारली. ठरल्याप्रमाणे तो गुरूवार पेठेतील एका घरात गेला. त्यावेळी चौघांनी तरुणाचा व्हिडीओ काढत असल्याचा बहाणा करून, तो व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन जबरदस्तीने त्याच्याकडून ५५ हजाराची खंडणी उकळली. एवढेच नाही तर रात्रभर त्याला खोलीत डांबून ठेवले. याप्रकरणी खडक पोलिसांनी दोघा सराईत गुन्हेगारास चौघांना अटक केली आहे. साहिल कुरेशी,अनिकेत जाधव, सुदामा चौधरी, रोहित चव्हाण अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. यातील कुरेशी व जाधव हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे पोलिसांनी सांगितले. याबाबत वडगाव शेरी (मुळ. इस्लामपुर, सांगली) येथील एका २४ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण हा मुळचा इस्लामपूर येथील आहे. तो एमबीएच्या दुसर्‍या वर्षाला शहरातील एका नामांकित



कॉलेजमध्ये शिकतो. तसेच तो एका बँकेचे काम पाहतो, त्याला त्याचे प्रतिमहिना ६० रुपये मानधन मिळते. सहा महिन्यांपूर्वी त्याचा कुरेशी याच्यासोबत फेसबुकच्या माध्यमातून परिचय झाला होता. दोघांची मैत्री झाल्याने ते फोनवर एकमेकांच्या संपर्कात होते. २८ मे रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास कुरेशी याने तरुणाला शरीरसंबंध ठेवायचे आहेत का असे विचारले. सुरूवातीला तरुणाने त्याला नकार दिला. मात्र काही वेळाने होकार दिला.

ठरल्याप्रमाने कुरेशी याने तरुणाला गौरी आळी गुरूवार पेठेतील एका घरात बोलावले. त्यानुसार तरुण २९ मे रोजी रात्री दोन वाजताच्या सुमारास सांगितलेल्या ठिकाणी गेला. कुरेशी हा अगोदरच तेथे हजर होता. तरुण तेथे गेला असता, काही वेळातच इतर तीन आरोपी तेथे आले. गाडीतील पेट्रोल संपल्याचे सांगून ते तिघे तेथे आले होते. काहीवेळ गप्पा झाल्यानंतर चौघा आरोपींनी दमदाटी करून तरुणाकडे पैशाची मागणी केली. मात्र, तरुणाने पैसे नसल्याचे सांगितले. त्यावेळी आरोपींनी तरुणाचा व्हिडीओ काढत तो गे असल्याचे दाखवून संबंधीत व्हिडीओ व्हायरल करण्याची व पैसे न दिल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली. दरम्यान अनिकेत याने तरुणाच्या हातीतील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून त्याचा पासवर्ड विचारला. तरुणाने भीतीपोटी पासवर्ड आरोपींना सांगितला.

त्यानंतर आरोपींनी तरुणच्या खात्यातून ऑनलाईन ५५ हजार ६८९ रुपये दुसर्‍याच्या खात्यात ट्रान्सफर करून घेतले. आरोपींनी तरुणाला त्या खोलीत सकाळी सात वाजेपर्यंत डांबून ठेवले होते. सकाळी तरुणाला सोडून देण्यात आले होते. घडलेल्या प्रकारामुळे तरुण घाबरला होता. त्यानंतर त्याने खडक पोलिस ठाण्यात धाव घेत त्याच्यासोबत झालेल्या घटनेची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून चौघांना अटक केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राहूल खंडाळे करीत आहेत.

# उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाचा छाप; बनावट बिअरसह 1 लाख 35 हजाराचा मुद्देमाल जप्त



कराड (सातारा) - राज्य उत्पादन शुल्कच्या कोल्हापूर विभागीय भरारी पथकाने कराड तालुक्यातील उंब्रजमध्ये छापा मारून बनावट बिअरचा साठा आणि साहित्य मिळून 1 लाख 35 हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या संशयिताची न्यायालयाने जामीनावर मुक्तता केली आहे. कराड तालुक्यात बनावट बिअरची निर्मिती : कराड तालुक्यात सातत्याने बनावट दारूची निर्मिती होत असल्याच्या घटना उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत उघडकीस येत आहेत. यापुर्वी देखील ओगलेवाडी परिसरात विदेशी कंपनीच्या बनावट दारूचा मोठा साठा जप्त करण्यात आला होता. उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने शनिवारी (दि. 4) उंब्रज (ता. कराड) येथे छापा मारून बनावट बिअरचा मोठा साठा जप्त केला. एका शेडमध्ये संशयित बनावट बिअरची निर्मिती करताना सापडला. ही बनावट बिअर ग्रामीण भागात चोरट्या पध्दतीने विकली जात असावी, असा उत्पादन शुल्क विभागाला संशय आहे.1 लाख 35 हजारा मुद्देमाल जप्त : उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने छामा मारून 1 लाख 35 हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच संशयीत सचिन नथुराम कमाने (वय 29, रा. लक्ष्मीनगर, उंब्रज, ता. कराड) याला अटक केली. त्याला कराड येथील न्यायालयात हजर केले असता त्याची जामीनावर मुक्तता करण्यात आली. राज्य उत्पादन शुल्कच्या कोल्हापूर विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक तथा राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपायुक्त बी. एच. तडवी यांच्या आदेशानुसार दुय्यम निरीक्षक पी. आर. पाटील, एस. एस. साळवे, आर. जी. येवलुजे, एस. एस. गोंदकर, एस. आर. नरळे, वर्षा पाटील, उमा पाटील, कॉन्स्टेबल अमोल यादव, विलास पवार, सुशांत बनसोडे, दीपक कापसे, नितीन जाधव, सचिन जाधवर, भीमराव माळी, विनोद बनसोडे यांनी केली. विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक पी. आर. पाटील हे या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

# पुणे बंगळुरु महामार्गावर भीषण अपघात, एकाच कुटुंबातील 5 जणांचा मृत्यू




सांगली - पुणे बंगळुरू महामार्गावर भीषण अपघातात एकाच कुटुंबातील 5 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कासेगाव येथे हा भीषण अपघातात झाला आहे. येवलेवाडी फाट्यावर थांबलेल्या कंटेनर जाऊन चारचाकी गाडी आदळून हा भीषण अपघात घडला आहे. मृत कुटुंबीय हे कोल्हापूरच्या जयसिंगपूर येथील आहेत. पिंपरी-चिंचवड येथून जयसिंगपूरकडे निघालेल्या एका कुटुंबियाच्या गाडीला भीषण अपघात झाला आहे. वाळवा तालुक्यातील पुणे बंगळुरू महामार्गावरील कासेगाव येथील येवलेवाडी फाटा या ठिकाणी हा भीषण अपघात घडला आहे. अरिंजय आण्णासो शिरोटे (वय 35 वर्षे), स्मिता अभिनंदन शिरोटे ( वय 38 वर्षे), सुनेशा अभिनंदन शिरोटे (वय 9 वर्षे), पुर्वा शिरोटे ( वय 14 वर्षे) आणि विरेन अभिनंदन शिरोटे ( वय 4 वर्षे), अशी अपघातातील मृतांची नावे आहेत. सर्व जण कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर येथील रहिवासी आहेत. शिरोटे कुटुंबीय पिंपरी-चिंचवड येथून जयसिंगपूर या आपल्या गावी निघाले होते. कासेगाव नजीक आले असता येवलेवाडी फाटा येथे रस्त्याच्या कडेला थांबलेल्या एका कंटेनरवर शिरोटे कुटुंबियांची भरधाव चारचाकी गाडी जाऊन आदळली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर तिघांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. हा अपघात इतका भीषण होता की शिरोटे कुटुंबियांच्या चारचाकी गाडीचा चक्काचूर झाला आहे. घटनास्थळी कासेगाव पोलिसांनी धाव घेत पंचनामा केला आहे. या अपघाताची नोंद कासेगाव पोलीस ठाण्यात झाली आहे.

पृष्ठ १ वरुन

## कौटुंबिक वादातून तहसीलदार बहिणीवर

हा आज सकाळी साडे अकराच्या सुमारास आशा वाघ यांच्या केज येथील कार्यालयात आला होता. यावेळी आशा वाघ आपल्या कक्षात नियमित काम करत होत्या. या ठिकाणीच त्यांच्या दोघांमध्ये बोलण्यातून वाद झाला. याच वादातून मधुकर याने आशा वाघ यांच्यावर धारदार कोयत्याने वार केले. यात त्यांच्या मानेवर आणि डोक्यावर वार झाल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. हल्ल्यात रक्त बंबाळ झालेल्या अशा यांनी मधूकर याच्या तावडीतून आपली सुटका करून कक्षाच्या बाहेर धाव घेतली. हा प्रकार तहसील कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी मधुकर याला पकडून एका खोलीत डांबून ठेऊन पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस तहसील कार्यालयात दाखल झाले. कर्मचाऱ्यांनी डांबून ठेवलेल्या मधुकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले. तोपर्यंत कर्मचाऱ्यांनी आशा यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. आंबाजोगाई येथील स्वराती रूग्णालयात सध्या आशा यांच्यावर उपचार सुरू आहेत. परंतु, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली आहे. आशा वाघ आणि भाऊ मधुकर वाघ यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून कौटुंबिक वाद सुरू होता. याच वादातून त्यांच्यावर आज सकाळी मधूकर याने हल्ला केल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून याबाबत अधिक तपास सुरू आहे.

## बहिणीला सतत मारहाण करणाऱ्या भावोजीची

वाजेच्या सुमारास जवळच असलेल्या एका फार्म हाउसवरील कामगार हे लघुशंकेसाठी उठला असता, त्यांना आग लागल्याचे दिसले. त्यांनतर हा सर्व प्रकार समोर आला. असा अडकला आरोपी.... शनिवारी रात्री मृतदेह पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत आढळून आल्यानंतर पोलिसांसमोर ओळख पटवणे मोठं आव्हान होते. मात्र पोलिसांनी या परिसरात असलेल्या सीसीटीव्हीची पाहणी केली. यावेळी बाजूला असलेल्या फार्म हाऊसवरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ॲक्टिव्हा गाडीवरून एक व्यक्ती मृतदेह घेऊन येताना स्पष्ट दिसून आला. त्यांनतर पोलिसांनी आणखी काही सीसीटीव्हीची तपासणी करत, आरोपीची ओळख पटवली. आरोपी स्पष्ट होताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. तर बहिणीला सतत होणाऱ्या मारहाणीचा बदला म्हणून, मेहुण्याकडूनच भावोजीची हत्या करण्यात आल्याच पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे.

## अश्लील व्हिडीओ कॉल करुन खंडणी

यांना दिसून आले तसेच ह्या घटनेचा समाजावर विपरीत परीणाम होत असल्यामुळे मा.पोलीस अधीक्षक, नंदुरबार श्री. पी.आर.पाटील यांनी याबाबत मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री. विजय पवार यांचेशी चर्चा करुन तसेच शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिपक बुधवंत व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र कळमकर यांना ताबडतोब कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केले. त्यावरुन शहादा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर घटनेबाबत शहादा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाल्यानंतर दाखल गुन्ह्यातील आरोपीत १) अश्लील व्हिडीओ कॉल करणारी महिला २) तथाकथीत पत्रकार नामे अतुल रामकृष्ण थोरात (चौधरी) वय-५० रा. दत्त कॉलनी, कोरीट रोड, नंदुरबार व ३) पोलीस नामे छोटु तुमडु शिरसाठ वय-४६ रा. सदाशिव नगर, शहादा ता. शहादा जि. नंदुरबार यांना ताब्यात घेवून तात्काळ अटक करण्यात असून मा. न्यायालयाने तीनही आरोपींना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी वरील घटना पाहता नागरिकांना आवाहन केले आहे कि नंदुरबार तसेच इतर राज्यातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारचे अश्लील व्हिडीओ कॉल करुन व बदनामी करण्याची भिती दाखवून खंडणी मागण्याचे प्रकार ज्या नागरिकांसोबत झाले असतील अशा नागरिकांनी कसलीही भिती न बाळगता समोर येवून पोलीस ठाण्याला तक्रार द्यावी. तक्रारदार यांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक, नंदुरबार श्री.पी.आर.पाटील, मा.अपर पोलीस अधीक्षक, नंदुरबार श्री. विजय पवार, मा. उप विभागीय पोलीस अधीकारी, शहादा श्री. श्रीकांत घुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र कळमकर, शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. दिपक बुधवंत, सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदीप पाटील, सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती नयना देवरे, शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक श्रीमती माया राजपुत तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अमंलदारांच्या पथकाने केली आहे. पथकाने केली आहे सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक,नंदुरबार श्री.पी.आर.पाटील,मा.अपर पोलीस अधीक्षक, नंदुरबार

## बंदुकीतुन हवेत गोळ्या झाडणाऱ्या 6 आरोपींना

तासाच्या आत फायरींगचा गंभीर गुन्हा उघडकीस आलेला आहे. सदरची कारवाई श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि. राहुल राख , गुन्हे शाखा घटक -१ चे प्रभारी पो.नि.अविराज कु-हाडे, अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पो.नि./देवीदास हांडोरे, सपोनि/दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, अमोल आंबवणे, कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, सफौ/पोशिरकर, राजु तांबे, पोहवा/जर्नादन मते, सुरेश राणे, मनोहर तावरे, थापा, गर्जे, गायकवाड, शिवा पाटील, राजविरसिंग संधु, विसपुते, पोना/लांडगे, पोअं/जगताप, प्रविणराज पवार, सुशिल पवार यांनी केलेली आहे.

## पोटच्या दोन मुलांचा खून केला, व्हिडीओ

सांगितलं. आरोपीच्या मित्राला गुन्ह्याची माहिती नव्हती. शेखच्या दुसऱ्या पत्नीने दिलेल्या तक्रारीनंतर मुर्शिदाबाद परिसरातील बेल डांगा पोलीस ठाण्यात दुहेरी हत्याकांडाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. तपासादरम्यान, पश्चिम बंगाल पोलिसांना आरोपी मुंबईत लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पोलिसांचे एक पथक 2 जून रोजी मुंबईत आलं. मुंबई गुन्हे शाखा युनिट 7 ने चौकशी सुरु केली. आरोपीचं ठिकाण शोधण्यासाठी पोलीस निरीक्षक सुधीर जाधव आणि पोलिस उपनिरीक्षक रामदास कदम यांनी तांत्रिक विश्लेषण केलं. तो मुलुंडमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळआलं. त्यानंतर पश्चिम बंगाल पोलिसांच्या पथकासोबत जाऊन त्याला अटक करण्यात आली, असं एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितलं. शेखला शनिवारी (4 जून) किला कोर्टात हजर करण्यात आले आणि त्याला 9 जूनपर्यंत ट्रान्झिट रिमांडवर पाठवण्यात आलं. पश्चिम बंगाल पोलीस आता शेखला पुढील तपासासाठी त्याच्या मूळगावी घेऊन जाणार आहेत, असं अधिकाऱ्याने सांगितलं.

## भाईंदर पश्चिम परिसरात हुक्का पार्लरवर

यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. देविदास हंडोर, सपोनि तेजश्री शिंदे-भरोसा सेल, पोहवा/धनाजी इंगळे, पी. डी. टक्के, ए. आर. सपकाळ, एस. ए. आव्हाड, पोशि. ओ. बी. यादव, व पो. हवा. व्ही. ए. घरबुडे तसेच - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदरचे सहापोउपनि/उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र एस. पाटील, पोशि/ केशव शिंदे यांनी संयुक्त कारवाई केली आहे.

## अडीच वर्षांच्या चिमुकल्याची विक्री

होती. त्यानुसार, पोलीस निरीक्षक के.एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून बाळाच्या विक्रीच्या प्रयत्नात असलेल्या संतोष पुरी शिवपूरी गोस्वामी ( वय 40 वर्षे, रा. बेकाराई, ता. सारडा, जि. भीलवाडा, राजस्थान ), दिनेश नंदलाल बनभैरू (वय 40 वर्षे, रा. लाडा, अकोला नाका, जि. वाशिम), कुसुमबाई देविदास गायकवाड ( वय 40 वर्षे, रा. राहुल नगर नांदेड), लक्ष्मी आदेश खरे ( वय 40 वर्षे, रा. नांदेड ), ललिता भिसे ( रा. कोरोची ता. हातकणंगले ) यांना त्यांच्या ताब्यातील लहान बाळासह ताब्यात घेण्यात आले असून संबंधित बाळास बालसुधारगृहात ठेवण्यात आले आहेत.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ०७ ते १३ जून - २०२२





## संपादकीय...

# राज्यसभा निवडणूक, आघाडीला घाम फुटलाय

राज्यसभेच्या सत्तावन्न जागांसाठी पंधरा राज्यांतून निवडणूक होत आहे. पैकी एकेचाळीस जागांवर निवडणूक बिनविरोध झाली असून पी. चिदंबरम यांच्यासह अन्य उमेदवार राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून आले आहेत. पण महाराष्ट्रासारख्या पुरोगामी व स्वतःला नंबर एक समजल्या जाणाऱ्या राज्यात मात्र महाविकास आघाडी सरकारला बिनविरोध निवडणूक घडविणे शक्य झाले नाही.

सत्ताधारी पक्षांची इच्छाशक्ती असती तर महाराष्ट्रातही राज्यसभेच्या सहा जागांसाठी होणारी निवडणूक बिनविरोध झाली असती. आपल्या पक्षाचे जास्त उमेदवार निवडून आणण्याची हाव ठेवायची आणि विरोधी पक्षाच्या नावाने बोटे मोडायची असा सध्या राज्यात प्रकार बघायला मिळतो आहे. राज्यात बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी महाविकास आघाडीचे तीनही पक्षांचे नेते विधानसभेतील विरोधी पक्षनेते व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना भेटायला गेले होते. अर्थात ही भेट म्हणजे त्याचा निव्वळ फार्स होता. भाजपने आपला तिसरा उमेदवार मागे घ्यावा हे सांगण्याचा त्यांचा खटाटोप होता, पण त्याऐवजी त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना भेटून शिवसेनेने आपला दुसरा उमेदवार मागे घ्यावा असे का नाही सांगितले? विधानसभेत शिवसेनेचे अवघे पंचावन्न आमदार आहेत. त्या बळावर राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाच्या कुबड्या घेऊन शिवसेनेला राज्यसभेत आणखी एक खासदार पाठवायचा आहे. ज्यांचा टेकू घेऊन हे सरकार चालले आहे, त्या टेकचंद नेत्यांनीच शिवसेनेला माघार घ्यायला लावली असती, तर राज्यसभेची बिनविरोध निवडणूक झाली असती.

राज्यसभा निवडणुकीत भाजपने तिसरा उमेदवार उभा केला आहे. माघार घेणार नाही असा मराठी बाणा दाखवला आहे. कारण राज्यात भाजप नंबर १ चा पक्ष आहे. भाजपला माघार घ्यायला सांगून राज्यसभेत आपला आणखी एक खासदार पाठवायचा आणि तेथे जाऊन मोदी-शहांच्या विरोधात गरळ ओकायची असा डाव भाजपने उधळून लावला आहे. गेल्या अडीच वर्षांत ठाकरे सरकारने पूर्ण वेळ विधिमंडळाचे अधिवेशन घेतलेच नाही. कोरोनाची ढाल पुढे करून अधिवेशन गुंडाळायचे ही पद्धत या सरकारने अवलंबिली. विरोधी पक्षाच्या माऱ्यातून सुटका करून घेण्यासाठी ठाकरे सरकारने नेहमीच पळ काढला आहे. अधिवेशनात मतदानाला सामोर जाण्यास हे सरकार घाबरते हे राज्यातील बारा कोटी जनतेला ठाऊक आहे. सरकारकडे भक्कम बहुमत आहे मग विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक घेण्यास सरकार टाळाटाळ का करते? राज्यसभेच्या सहा जागांसाठी सात उमेदवार मैदानात आहेत. भाजपचे तीन, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येकी एक व शिवसेनेचे दोन उमेदवार रिंगणात आहेत. यापैकी एक जण पराभूत होणार हे निश्चित आहे. मग तो कोण पडणार याची उत्सुकता सर्वांना आहे. महाआघाडीचा उमेदवार पडला तर ठाकरे सरकारची नाचक्की होईल. शिवसेना किंवा काँग्रेसचा उमेदवार पडला तरी ठाकरेकडे बहुमत नाही, हा संदेश देशभर जाईल. या निवडणुकीत भाजपचे टार्गेट, काँग्रेस की शिवसेना, यावर सर्वच राजकीय पक्षांत मोठा खल चालू आहे.

ठाकरे सरकार सत्तेवर आल्यापासून भाजपला सूडबुध्दीने वागवत आहे. पोलीस व प्रशासकीय यंत्रणा भाजपच्या नेत्यांच्या विरोधात काम करीत आहे. पोलीस व प्रशासनाच्या बळावर भाजप नेत्यांना हैराण करणे हा एक कलमी कार्यक्रम ठाकरे सरकारने चालवला आहे. भाजपला रोखले तरच आपले सरकार वाचू शकते हे ठाकरे सरकारचे गणित आहे. भाजपच्या नेत्यांना नोटिला पाठवणे, त्यांच्यावर पोलीस केसेस दाखल करणे यातच या सरकारची शक्ती खर्च होत आहे. पाहिजे तर येणाऱ्या विधान परिषद निवडणुकीत भाजपला एक जागा आम्ही जास्त देतो, भाजपने तिसरा उमेदवार मागे घ्यावा, असा प्रस्ताव आघाडीच्या नेत्यांनी फडणवीस व पाटील यांना दिला होता. पण या दोन्ही नेत्यांनी तो फेटाळून लावला.

काय व्हायचे ते होईल, भाजप तिसरी जागा लढवणारच, भाजपच्या पाठीशी संख्याबळ आहे, असे फडणवीस व पाटील सांगत आहेत. त्यामुळे अपक्ष व छोट्या पक्षांकडे असलेली २९ मते कोणाकडे जाणार या विचाराने महाआघाडीचे नेते अस्वस्थ आहेत. महाआघाडीत असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या आमदारांचीच कामे होत नाहीत, त्यांच्या मतदारसंघात निधी पुरेसा मिळत नाही. तीनही पक्ष एकमेकांवर कुरघोडी करीत असतात. काँग्रेसला तर आघाडीत लिंबू टिंबू म्हणून ठेवले आहे. मग राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेच्या दुसऱ्या उमेदवाराला मते देऊन आपले काय भले होणार आहे? गरज सरो, वैद्य मरो अशी आघाडीची विशेषतः शिवसेनेची कार्यपद्धती आहे. मग हातचे सोडून शिवसेनेच्या नादी कोण लागेल, अशी मानसिकता अपक्ष आमदार व छोट्या पक्षांमध्ये दिसून येत आहे. कोल्हापूरचे छत्रपती संभाजी राजे यांना राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांनी कशा वाटाण्याच्या अक्षता लावल्या हे उभ्या महाराष्ट्राने अनुभवले आहे. जर छत्रपतींना उमेदवारी द्यायची नव्हती, तर त्यांच्याबरोबर आघाडीच्या नेत्यांनी चर्चेचे गुऱ्हाळ कशासाठी चालू ठेवले? जे छत्रपतींचा अवमान करू शकतात, ते आपली काय किंमत ठेवणार, असा प्रश्न अपक्षांना पडल्यास आश्चर्य वाटायला नको. महाआघाडी संकटात आली की, ईडी आणि सीबीआयचा सत्ताधारी आमदारांवर दबाव आणला जातो आहे, असा हास्यास्पद आरोप केला जातो. असा आरोप करणारे एकच प्रवक्त आहेत. मग लोकप्रतिनिधींना संरक्षण देण्यात ठाकरे सरकार कमी पडत आहे काय, हे एकदा त्यांनी खुलेपणाने सांगावे. राज्यसभा निवडणुकीच्या निमित्ताने ठाकरे सरकारला घाम फुटला आहे.

# धडाडी आणि धोरण

प्रथमच म्हणता येतील अशा दोन घटना गेल्या आठवड्यात घडल्या. एक म्हणजे आपले परराष्ट्रमंत्री सुब्रमण्यम जयशंकर यांनी युरोपच्या भूमीवर युरोपला ठणकावले. ''आपल्या समस्या या जगाच्या समस्या आहेत या मानसिकतेतून युरोपने बाहेर यायला हवे'' असे त्यांचे विधान. दुसरी घटना थेट अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री अँथनी ब्लिंकेन यांनीच भारतातील वाढत्या धार्मिक असंवेदनशीलतेसंदर्भात केलेले विधान. ''जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशात धर्मस्थळे आणि काही धर्मीयांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढते आहे,'' असे ब्लिंकन म्हणाले. अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यानेच भारताविषयी असे विधान याआधी कधी केले होते हे आठवणारही नाही, इतकी ही घटना दुर्मीळ. छोटेमोठे अधिकारी, स्वयंसेवी संस्था वा लोकप्रतिनिधी यांनी भारताविषयी काहीबाही बोलणे आणि परराष्ट्रमंत्र्यासारख्या धोरणप्रमुखाने असे विधान करणे यात प्रचंड फरक आहे, हे सांगण्याची गरज नाही. ब्लिंकेन यांच्या विधानाचा चोख प्रतिवाद परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने केला, हे योग्यच. भारताच्या परराष्ट्रमंत्र्याने युरोपला ठणकावणे आणि अमेरिकी परराष्ट्रमंत्र्याने भारतास सुनावणे या दोन्हींचे महत्त्व लक्षात घेता त्याचा अन्वयार्थ लावणे आवश्यक ठरते.

प्रथम जयशंकर यांच्या विधानाविषयी. त्याआधी त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. यासाठी त्यांचे देशांतर्गत पातळीवर स्वागतच होईल आणि त्यांच्या या विधानातून 'नवा भारत' दिसून येतो वगैरे प्रतिक्रियाही व्यक्त होतील. राष्ट्रप्रेमाच्या सध्याच्या उन्मादात तसे होणे रास्तच. तथापि त्यातून काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात, त्यांची उत्तरे या धडाडीद्वारे मिळतात काय, याचा शोध घ्यायला हवा. जयशंकर यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की युरोपवरील संकटाची चिंता जगाने करण्याचे कारण नाही. त्यांनी या संदर्भात चीनचे उदाहरण दिले. चीन आणि भारत हा मुद्दा युक्रेन-रशिया आणि युरोप या दुहीच्या नजरेतून पाहता नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. थोडक्यात युरोपने आपले पाहावे आणि आमचे आम्ही पाहून घेऊ. वरवर पाहू गेल्यास ही भूमिका योग्यच. परंतु युरोपच्या समस्या या समस्त विश्वासमोरील समस्या नाहीत हे तत्त्व मानले तर भारतासमोरील समस्यांची उठाठेव जगाने करण्याचे कारण नाही, हेही मान्य करावे लागेल. इतक्या कोरडेपणाने 'आमचे आम्ही' ही भूमिका स्वीकारण्यासही हरकत नाही. पण मग भारतात इंधन संकट आहे म्हणून सौदी अरेबियाने त्याचा विचार करावा ही मागणी करता येणार नाही. अशी मागणी भारताने केली होती आणि सौदी राजपुत्र महंमद बिन सलमान याने त्याबद्दल भारतास जाहीरपणे सुनावले होते. या नव्या तत्त्वानुसार मग सौदी राजपुत्राचे म्हणणे रास्त म्हणावे काय? भारतात करोनाचा कहर आहे म्हणून जगातील प्रमुख वैद्यक संशोधन कंपन्यांनी बौद्धिक संपदा कायद्यातून भारतास सूट द्यावी अशीही याचना करता येणार नाही. ती आपण केली होती आणि जर्मनीच्या चॅन्सेलर अँगेला मर्केल यांनी आणि अन्य युरोपीय नेत्यांनी ती धुडकावून लावली होती. तेव्हा त्यांची ती भूमिका योग्य असे आपण म्हणणार काय? तसेच आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचे संकेत दूर ठेवून विविध देशांनी भारताशी मुक्त व्यापार करावा, अशीही इच्छा करता येणार नाही. आंतरराष्ट्रीय मंचावर आपण नेहमी पाक-पुरस्कृत दहशतवादाबद्दल तक्रारीचा सूर लावतो आणि जगाने याची दखल घ्यावी अशी मागणी करतो. त्यावर भारताची समस्या जगाने विकत घेण्याचे कारण नाही, असे कोणी आपणास सुनावल्यास ते योग्य ठरेल काय? भारतीय तरुणांना युरोप वा अमेरिकेत शिक्षणादी उद्दिष्टांसाठी अधिक संख्येने प्रवेश द्यायला हवा, ही आपली मागणी असते. या नव्या 'आमचे आम्ही' तत्त्वानुसार ती यापुढे नाकारली गेल्यास आपण तिचे स्वागत करणार काय?

दुसरा विषय ब्लिंकेन यांच्या विधानाचा. 'अमेरिका आंतरराष्ट्रीय संबंधांतील मतांच्या राजकारणातून हे विधान करीत आहे,' असे आपले प्रत्युत्तर. यामागील धडाडी कौतुकास्पद खरीच. पण आंतरराष्ट्रीय संबंधांतील मतांचे राजकारण म्हणजे काय? ढोबळमानाने त्याचा अर्थ अमेरिका इस्लामी देशांच्या तुष्टीकरणाचा प्रयत्न करते, असा होतो. या इस्लामी राजवटींचा आपण इतका द्वेष करीत असू तर सध्या अफगाणिस्तानातील अत्यंत कर्मठ धर्मवादी तालिबानी राजवटीशी चर्चा करण्यासाठी आपले अधिकृत शिष्टमंडळ नुकतेच रवाना झाले, त्यास काय म्हणायचे? तेल मिळवण्यासाठी आपण इराणी अयातोल्ला आदींचे मन वळवण्याचा प्रयत्न करतो, ते काय असते? ऐन निवडणुकांच्या तोंडावर अमेरिकेत जाऊन 'अगली बार..'ची घोषणा देण्याची ऐतिहासिक अराजनैतिकता दाखवली गेली असल्यास ती मतांचे राजकारण ठरत नाही काय? अशा अडचणीच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रघात जगातील या 'सर्वात मोठ्या' वगैरे लोकशाही देशात अलीकडे नाही हे मान्य केले तरी मुद्दा असा की देशांतर्गत विरोधकांवर 'मतांच्या राजकारणाचा' आरोप करण्याचा सुलभ मार्ग आंतरराष्ट्रीय मंचावर करणे हा नवा धोरणीपणा मानता येईल काय? याहीआधी अमेरिकेने फेब्रुवारी महिन्यात भारतातील वाढत्या असहिष्णुतेविषयी भाष्य केले होते. त्याचाही असा तडाखेबंद प्रतिवाद करताना आपण अमेरिकेतील वाढते वांशिक हल्ले आणि बंदुकसंस्कृतीचे मुद्दे उपस्थित केले होते. ते योग्यच. पण यातील फरक असा की अमेरिकेत त्या देशाच्या सरकारला धारेवर धरणाऱ्या यंत्रणा त्या देशातच आहेत. तितक्या समर्थ यंत्रणा आपल्याकडेही आहेत असेच मानायचे असेल तर कोणत्याही सुधारणेची गरज दाखवणारी चर्चाच खुंटते. पण तशी गरज आहे असे मानणाऱ्यांनी काही मुद्द्यांचा विचार करायला हवा. अमेरिकेतील बंदुकसंस्कृतीवर टीका करणे अगदी योग्यच. पण या संस्कृतीचा उदोउदो करणाऱ्या तिच्या जाहीर पाईकांविषयी आपण काही भाष्य केल्याचे दिसले नाही. त्यामागील कारण या बंदुकसंस्कृतीचे खंदे पुरस्कर्ते त्या देशातील रिपब्लिकन पक्षीय आहेत, हे तर नाही? माजी अध्यक्ष आणि भारतीय नेत्यांचे जिवलग मित्र जे की डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडे शाळेतील गोळीबार प्रकारानंतर शिक्षकांनाही बंदुका द्यायला हव्यात असे विधान केले. त्यावर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने काही तडाखेबंद भाष्य केल्याचे अद्याप तरी समोर आलेले नाही. ते केले नसेल तर तोही 'आंतरराष्ट्रीय मतांच्या राजकारणा'चा भाग मानायचा काय? दुसरा मुद्दा असा की अमेरिकेतील वांशिक हल्ल्यांचा धिक्कार त्या देशाचे सरकारच प्राधान्याने करते. त्यामुळे आपल्या देशाचे सरकारही धार्मिक हल्ल्यांचा निषेध तितक्याच तीव्रपणे करेल अशी आशा बाळगावी काय? या संदर्भात तिसरा मुद्दा असा की अमेरिकेत वांशिक हल्ले होतात म्हणून अमेरिकेने भारतातील धार्मिक विद्वेषाविषयी बोलता नये यास 'व्हॉटअबाऊटरी' म्हणतात. ती देशांतर्गत राजकारणात विरोधकांवर गप्प बसवण्यासाठी उत्तम. पण आंतरराष्ट्रीय मंच, त्यातही अमेरिकी माध्यमे, या अशा युक्तिवादांस जराही भीक घालत नाहीत. 'आमचेही वाईट आणि तुमचेही तितकेच वाईट' या पद्धतीनेच त्यांचे वार्तांकन होत असते आणि प्रखर राष्ट्रवादाच्या भावनेतून कितीही वाईट वाटत असले तरी अमेरिकी माध्यमांची विश्वासार्हता कोणत्याही राजनैतिक वाद-प्रतिवादापेक्षा अधिक मानली जाते.



तेव्हा धडाडी हा गुण खराच. पण हे धोरण असू शकत नाही. आंतरराष्ट्रीय मंचावरील अशा धडाडीचा उपयोग फक्त देशांतर्गत उदोउदोसाठीच होतो. 'बघा; कसे सुनावले त्यांना' ही प्रतिक्रिया आपणा सर्वांसाठी आनंददायी खरीच. पण धोरण हे अशा धडाडीच्या पलीकडे असते, हेही विसरता येणार नाही.

# पावसाळ्यातील आजारांना तोंड देण्यासाठी ग्रामीण आरोग्य यंत्रणा सज्ज

## साथ नियंत्रण कक्ष व भरारी पथकाची स्थापना

ठाणे, (जिमाका): आगामी पावसाळ्याला तोंड देण्यासाठी जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. साथरोगाच्या काळात करावयाच्या उपाययोजनांबाबत आरोग्य विभागामार्फत जिल्हा, तालुका, प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर साथ नियंत्रण कक्ष व पुरपरिस्थिती नैसर्गिक आपत्ती काळासाठी भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक आरोग्य संस्थेस आवश्यक तो औषधांसह सर्पदंशवरील इंजेक्शन उपलब्ध करून देण्यात आली आहेत, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर काम करीत असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हास्तरावर तीन भरारी पथक स्थापन करण्यात आले असून ती 24 तास कार्यान्वित करण्यात आली आहेत. जिल्ह्यात तीन तज्ञ डॉक्टरांचे शिघ्र प्रतिसाद पथक कार्यरत असून येथील आरोग्य विभागात साथ नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. तालुका, प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर देखील हा कक्ष कार्यान्वित आहे.

तालुकास्तरावर भरारी पथक स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये गट विकास अधिकारी, तालुका वैद्यकिय अधिकारी, तालुका पर्यवेक्षक, आरोग्य कर्मचारी यांचा समावेश आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांसह 24 तास कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

प्रत्येक आरोग्य संस्थेस आवश्यक त्या औषधसाठ्यासोबत सर्पदंशवरील इंजेक्शन सुध्दा उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्याचबरोबर जिल्हास्तरावर जादा औषधसाठा देखील उपलब्ध करण्यात आला आहे.

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे ज्या गावांचा संपर्क तुटतो अशा ठिकाणी आशा सेविका आणि अंगणवाडी सेविका यांना प्राथमिक उपचारासाठी औषधे देण्यात आली आहेत. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांवर पावसाळा सुरू होण्यापूर्वी आवश्यक असणाऱ्या 21 औषधांची यादी पाठविण्यात आली असून तीन महिने पुरेल इतका औषधसाठा करण्याबाबत सूचना देण्यात आल्याचे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले.

ग्रामीण भागात संभाव्य आपत्कालीन पूरपरिस्थितीमुळे साथीच्या रोगांचा फैलाव होण्याच्या शक्यतेमुळे सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य पथक, दवाखान्यांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गावात दवंडी देवून पाणी उकळून व गाळून पिणे, पिण्याचे पाण्याचे साठे नियमित ब्लिचिंग पावडरद्वारे शुध्दीकरण केले जाते किंवा नाही त्याची पडताळणीकरीता ओ.टी. टेस्ट नियमितपणे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आपत्कालीन कक्ष तयार करुन वैद्यकिय पथकास प्रथमोपचार किट व मेडिसीन किट तयार करण्याबाबत सुचना दिल्या आहेत, असे डॉ. परगे यांनी सांगितले.

# 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत ठाणे महानगरपालिकेची 'अमृत' कामगिरी



ठाणे: माझी वसुंधरा अभियान २०२२ अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांवर आधारित महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. पंचतत्त्वांचे संवर्धन, संरक्षण व जतन करून शाश्वत विकास साधण्यासाठी सुरू केलेल्या या स्पर्धेत "अमृत" गटामध्ये विभागस्तरावर कोकण विभागात अत्युत्कृष्ट कामगिरीकरिता ठाणे महानगरपालिकेचा सन्मान करण्यात आला. यावेळी ठाणे महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा, अतिरिक्त आयुक्त २ संजय हेरवाडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पर्यावरणदिनी टाटा थिएटर, एन.सी.पी.ए., नरिमन पाइंट, मुंबई येथे झालेल्या या सन्मान सोहळयास अतिरिक्त नगर अभियंता अजुर्न अहिरे, उपआयुक्त मारुती खोडके, प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान, उपनगर अभियंता विनोद पवार, उपनगर अभियंता विनोद गुप्ता, सेवाभावी संस्था प्रतिनिधी भटू सावंत उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सदर अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पाणीपुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहर विकास विभाग, शिक्षण विभाग, प्रदूषण नियंत्रण विभाग व इतर सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली होती. सर्व माहिती संकलन करून शासनाच्या पोर्टलवर सादर करण्याची जबाबदारी प्रदूषण नियंत्रण विभागाने यशस्वीपणे सांभाळली. ठाणे महापालिकेस प्राप्त झालेल्या या सन्मानामुळे महापालिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची दुसऱ्या क्रमांकाची झेप

कल्याण : माझी वसुंधरा अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने २२ क्रमांक ओलांडून सोळावा क्रमांक पटकावला असून हाई जंप श्रेणीचे द्वितीय पारितोषिक महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना प्रदान करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या कुशल नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली वर्षभराच्या अथक परिश्रमानंतर महापालिकेने अमृत श्रेणी अंतर्गत ५५०० पैकी एकूण ३३७१ गुणांसह १६ वा क्रमांक पटकावला आहे. या श्रेणीमध्ये महानगरपालिकेने रँकिंगमध्ये गतवर्षीच्या तुलनेत सर्वोच्च, अतुलनीय कामगिरी करून थेट १६ व्या स्थानी झेप घेतली असल्यामुळे, महापालिकेस हाय जंप श्रेणीतील दुसऱ्या क्रमांकाच्या पुरस्काराने टाटा थिएटर, एनसीपीए मुंबई येथे रविवारी एका दिमाखदार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता सपना कोळी-देवन पल्ली, उपायुक्त अतुल पाटील, माजी उपायुक्त रामदास कोकरे, संजय जाधव उपस्थित होते.

पोलीस बातमी पत्र


संमिश्र

४

मुंबई, मंगळवार ०७ ते १३ जून - २०२२

# पिण्याच्या पाण्यावरून चौघांना भोसकले; वाळूज भागातील घटना

औरंगाबाद शहरातील आणि परिसरातील भागात पाणी प्रश्न गंभीर होत चालला आहे. पाणीपुरवठा सुरळीत करताना प्रशासन सुद्धा हतबल होतांना पाहायला मिळत आहे. अशात आता पिण्याच्या पाण्यावरून नागरिकांमध्ये हाणामारीच्या घटना समोर येत आहे. वाळूज महानगर भागात नळाचे पाणी भरण्यावरून दोन कुटुंबीयांत जोरदार हाणामारी होऊन चौघांना चाकूने भोसकल्याची घटना घडली आहे. त्यांनतर परस्परविरोधी तक्रारीवरून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, रांजणगाव शेणपुंजी येथील प्रभाकर चोरमले हे कुटुंबासह किरायाच्या घरात राहतात. बाजूलाच दुसऱ्या खोलीत भाऊसाहेव दळवी यांचे कुटुंब सुद्धा किरायाने राहतात. काही दिवसांपासून सामायिक नळाचे पाणी भरण्यावरून दळवी आणि चोरमले कुटुंबात वाद व्हायचे. दरम्यान शनिवारी सायंकाळी दोन्ही घरांतील महिलांचा पुन्हा पाण्यावरून वाद झाला. या वादानंतर रात्री दळवी कुटुंबातील तिघांनी चोरमलेंच्या घरी जाऊन त्यांना अश्लील शिवीगाळ केली.



आईला शिवीगाळ केली जात असल्याने संकेत चोरमले हा समजावण्यासाठी घराबाहेर आला. यावेळी योगेश दळवी याने संकेतवर चाकूने वार केले. संकेतने मदतीसाठी आरडाओरडा केला असता त्याचे आई-वडील आले. योगेशने प्रभाकर चोरमले यांच्यावर सुद्धा चाकूने दोन तर, चोरमले यांच्या पत्नीवर एक वार केला.

परस्परविरोधी गुन्हे दाखल...

घटनेची महिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनतर पोलिसांनी गंभीर जखमी चार जणांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असून,त्यांच्यावर उपचार सुरु आहे. तर याप्रकरणी संकेत चोरमले यांनी भाऊसाहेब, योगेश, महेश व दळवीबाई यांच्याविरुद्ध तक्रार दिली आहे.

तर भाऊसाहेब दळवी यांनीही प्रभाकर चोरमले, संकेत चोरमले व नितीन चोरमले यांनी आपल्याला व कुटुंबीयांना मारहाण केल्याची तक्रार दिली. यावरून दोन्ही कुटुंबांतील 7 जणांविरुद्ध एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पाणी प्रश्न गंभीर...

औरंगाबाद शहरातच नव्हे तर आता परिसरातील आणि ग्रामीण भागात सुद्धा पाणी टंचाई जाणवत आहे. त्यामुळे पाण्यासाठी नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.

तर पिण्याच्या पाण्यावरून आता वाद होताना सुद्धा पाहायला मिळत आहे. त्यातच वाळूजच्या घटनेनंतर पिण्याच्या पाण्याची परिस्थिती किती गंभीर बनली आहे, याचा अंदाज येऊ शकतो.

# मुलाच्या लग्नाच्या तोंडावर वृद्ध पतीने केली पत्नीची हत्या




नागपूर : मुलाच्या लग्नाच्या तोंडावरच घरगुती वादातून वृद्ध पतीने पत्नीची चाकूने वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना नागपुरात घडली आहे. रामदास बोरीकर असे हत्या करणाऱ्या 60 वर्षीय वृद्ध पतीचे नाव आहे. तर छाया बोरीकर (52 वर्षे) असे मयत पत्नीचे नाव आहे. कौटुंबिक वादातून ही हत्या झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी पोलिसांनी पतीला अटक केली आहे.शनिवारी सकाळी 7 च्या सुमारास ही घटना घडल्यांनातर जुनी मंगळवारी परिसरात एकच खळबळ उडाली. रामदास आणि छाया बोरीकर या दाम्पत्याला दोन मुले आणि एक मुलगी आहे. त्यांचा मोठा मुलगा सतीश बोरीकर याचे येत्या नऊ तारखेला लग्न होणार होते. रामदास आणि छाया या दोघांमध्ये नेहमी घरगुती कारणांवरून वाद होत असे. त्यामुळे रामदास बोरीकर हे पत्नी छाया आणि मुलांपासून गेल्या पाच वर्षांपासून वेगळे राहत होते. रामदास जुनी मंगळवारी परिसरात कन्या शाळेच्या मागे जुन्या घरात राहत होते. दरम्यान सतिश बोरीकर यांचे लग्न ठरल्यामुळे त्याने आपल्या वडिलांना सोबत राहण्याचा आग्रह केला, मात्र वडिलांनी याबाबत त्याला स्पष्ट नकार दिला. त्यामुळे पुत्र सतिशने याबाबत आई छाया यांना सांगितले.

आईने मुलाच्या मनातील खंत ओळखून मी उद्या वडिलांना समजावून घरी राहण्यास घेऊन येते असे सांगितले. त्यानंतर छाया बोरीकर आज सकाळी दूध आणण्याकरिता 6.45 वाजता घरून निघाल्या आणि तिथून रामदास बोरीकर यांच्याकडे जाऊन पोहोचल्या. तिथे रामदास बोरीकर आणि छाया यांच्यात पुन्हा एकदा कडाक्याचे भांडण झाले. रागाच्या भरात रामदास बोरीकर यांनी पत्नी छाया बोरीकर यांच्या चेहऱ्यावर आणि पोटावर चाकूने वार करत गंभीर जखमी केले. मुलांना ही माहिती कळताच त्यांनी आईला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी नेले, मात्र उपचारादरम्यान छाया यांचा मृत्यू झाला होता. लकडगंज पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करत आरोपी रामदास बोरीकर यांना अटक केली आहे. पोलीस पुढील तपास करत आहे.

# महिन्याला तब्बल 25 टक्के व्याज अन् दिवसाला आठशे रुपये दंड, कथीत सावकाराला ठोकल्या बेड्या

चित्रपटात दाखवलेल्या क्रूर लालची सावकाराला लाजवेल अशी घटना कल्याणमध्ये उघडकीस आली आहे. दोन, पाच, दहा टक्के नव्हे तर दरमहा तब्बल 25 टक्के व्याज आणि महिना संपल्यानंतर दिवसाला आठशे रुपये दंड उकळणाऱ्या एका कथित सावकाराला कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी गजाआड केल आहे. दर्पण मंडाळे असं या कथीत सावकराचं नाव असून त्याच्यासह त्याची पत्नी,

बहीण, आई यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याण पश्चिमेतील चिकणघर परिसरात राहणाऱ्या सुशांत मोहिते या तरुणाला काही पैशाची गरज होती. लगेच पैसे पाहिजे असल्याने त्याने काही मित्रांकडे पैशासाठी विचारणा केली.

एका मित्राने सुशांत याला व्याजाने पैसे देणाऱ्या दर्पण मंडाले याची ओळख करून दिली. सुशांत याने दर्पणकडून प्रथम 50 हजार रुपये दरमहा 25 टक्के व्याजाने घेतले. हे पैसे व्याजासह परत केल्यानंतर पुन्हा काही महिन्यांनी 1 लाख रुपये दरमहा 25 तक्के व्याजाने घेतले. काही महिन्यांचं व्याज थकल्याने दर्पण याने पैशासाठी सुशांतकडे तगादा लावला.



साकाराच्या तगाद्याने काही महिन्यात सुशांत याने व्याजासह दर्पणला तीन लाख 54 हजार 500 रुपये परत केले. परंतु, इतके सगळे करुन देखील दर्पण आणि त्याचे साथीदार व्याजाच्या रक्कमेत काही पैसे बाकी आहेत. व्याज देण्यात उशिर झाल्याने दंडात्मक कारवाई म्हणून बाकी असलेले पैसे असे मिळून आणखीन चार लाख रुपयांची मागणी करत होते. सर्व पैसे देऊन देखील आता आणखीन पैसे कुठून आणू अशी सुशांत याने विनंती केली.

मात्र दर्पण काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता.

दर्पण, त्याची आई विजया, बहिण विशाखा , पत्नी मनिषा यांनी सुशांत याच्या घरी जावून गोंधळ घालत पुन्हा त्याला दमदाटी केली. या प्रकरणी कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास करताना आकारण्यात आलेले हे भयानक व्याज पाहून पोलिसही चक्रावले. वरिष्ठ पोलीस निरिक्षक अशोक होनमाने आणि पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करून दर्पण याला अटक केली आहे. अन्य तीन आरोपी अद्याप फरार आहेत.

दरम्यान, दर्पण याने अशा प्रकारे अनेक गरजू नागरिकांना अव्वाच्या सव्वा व्याजाने पैसे देत पिळवणूक केली असून याचा तपास पोलीस करत आहेत. पीडित लोकांनी पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांनी केले आहे.

# तीनशे रुपयांवरून सुरु झाला दोघात वाद; मध्यस्थीसाठी गेलेल्या तिसऱ्याच्याच झाला घात




औरंगाबादच्या फुलंब्री तालुक्यातील पोखरी गावात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अवघ्या तीनशे रुपयांच्या उसनवारीवरून झालेल्या दोघांच्या भांडणात मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. डोक्यात कुऱ्हाड मारल्याने जखमी झालेल्या तरुणाचा उपचार सुरु असताना मृत्यू झाला आहे. अरबाज शेख असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर गावात खळबळ उडाली आहे. मारहाण करणाऱ्या आरोपींच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात अली आहे. याबाबत अधिक माहिती आधी की, पोखरी येथील आकाश मुळे याच्याकडून अजय घाडगे याने तीनशे रुपये उसने घेतले होते. बरेच दिवस झाल्याने आकाश हा अजयकडे पैसे मागण्यासाठी गेला होता.पण पैसे मागण्यासाठी आलेल्या आकाशसोबत अजयचा त्याचा वाद झाला. त्यांनतर काही वेळाने अजयने आकाशाला फोन केला. पोखरी येथे ये आणि माझ्याकडे बाकी असलेले पैसे घेऊन जा म्हणाला. पैसे परत मिळणार आहे असे समजून आकाश पाखरीत आपल्या सहकाऱ्यांसह पैसे आणण्यासाठी गेला. पण तिथे परिस्थिती वेगळीच होती.मध्यस्थी करणे पडले महागात... आकाशला फोनवरून पैसे देण्यासाठी बोलवणारा अजय आपल्यासोबत काही महिला आणि पुरुषांना हातात काठ्या,कुऱ्हाडी घेऊन उभे होते. आकाश येताच अजयने पुन्हा वाद घालायला सुरवात केली. त्यांनतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. वाद अधिकच पेटत असल्याने तिथे उभा असलेला अरबाज शेख हा तरुण भांडण सोडण्यासाठी मध्ये पडला. तेव्हा अजय घाडगे याच्या गटातील लोकांनी मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या अरबाजच्या डोक्यात कुऱ्हाड घातली. ज्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ औरंगाबादच्या एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे आयसीयू उपलब्ध नसल्याने शासकीय घाटी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र उपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी अजय राजेश घाडगे, राजेश साहेबराव घाडगे, अरुण राजेश घाडगे, अरुणा विकास इंगळेविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना अटक करण्यात आली आहे.

# न विचारताच अॅड केलं व्हॉट्सअॅप ग्रुपवर, अन् तरुणासोबत घडला जीवघेणा प्रकार




नाशिक, : सध्या सोशल मीडियाचा जमाना आहे. प्रत्येक जण शेकडो व्हाट्सअॅप ग्रुपमध्ये अॅड झालेला असतो. मित्र परिवार, नातेवाईक, ऑफिस, कामानिमित्त असे ग्रुप प्रत्येकाच्या व्हाट्सअॅपमध्ये आहेत. याच व्हाट्सअॅप वरुन एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना नाशिकमध्ये घडली.

व्हॉट्सअॅप ग्रुपच्या कारणावरुन एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये न विचारता अॅड केल्यामुळे ही घटना घडली. या हल्ल्यामध्ये एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. या जखमी तरुणावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. व्हॉट्सअॅप ग्रुपमुळे वाद झाल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. ही धक्कादायक घटना नाशिकच्या विजय नगर परिसरात घडली.

न विचारचाच एका तरुणाला व्हाट्सअॅप ग्रुपमध्ये अॅड करण्यात आले होते. याचा राग मनात ठेवून दोघांनी कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. दीपक डावरे, असे हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतली. तसेच तपास करत याप्रकरणी दोन अल्पवयीन तरुणांना ताब्यात घेतले.

त्यांची कसून चौकशी सुरू आहे. मात्र, या हल्ल्यामुळे सोशल मीडियातील शुल्लक वादातून टोकाची पावलं तरुणाई उचलत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.

# हजार रुपयांवरुन वाद, गॅरेज मेकॅनिकवर जीवघेणा हल्ला

कल्याण: केवळ हजार रुपयांच्या वादातून एका गॅरेज मेकॅनिकवर चाकूने हल्ला करत त्याला जखमी केल्याची धक्कादायक घटना कल्याण पश्चिममध्ये घडली. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. या प्रकरणी खडकपाडा पोलिसांनी तीन जणाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. हसन खोत असं जखमी कर्मचाऱ्याचं नाव असून त्याच्यावर मुंबई येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याचे अन्य दोन साथीदार फरार आहेत.

काय घडलं?

गॅरेज मेकॅनिकवर चाकूने हल्ला करणाऱ्या सागर माळवे याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्या दोन फरार साथीदारांचा शोध सुरू आहे. कल्याण पश्चिमेतील वाडेघर परिसरात असलेल्या एका गॅरेजमध्ये हसन खोत हा तरुण मकेनिक म्हणून काम करतो. या गॅरेजच्या शेजारी गाड्यांचे वॉशिंग सेंटर आहे. काही दिवसापूर्वी गॅरेजमधील एक गाडी घेवून हसन



बाजूच्या वॉशिंग सेंटरमध्ये गेला. हसनने गाडी धुण्यासाठी उभी केली, मात्र याच वेळी सागर माळवे हा तिथे आला आणि त्याने आधीचे एक हजार रुपये बाकी आहेत, ते आधी दे असं हसनला सांगितलं. यावर हसनने माझा मालक पैसे देईल असे सांगितले. मात्र याच दरम्यान दोघांमध्ये वाद झाला.

# बनावट परवाना तयार करुन 'मुन्नाभाई'नं थाटला हॉस्पिटलचा गोरखधंदा, हिंगोलीतील प्रकार उघड

हिंगोलीच्या सेनगाव शहरात बनावट प्रमाणपत्र तयार करून बोगस हॉस्पिटल उभारण्यात आले आहे. चक्क आरोग्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या हॉस्पिटलचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला, मात्र या बोगस प्रमाणपत्राच्या आधारे रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या गोरखधंद्यावर डॉक्टरांच्या निमा संघटनेने आक्षेप घेतला.

सेनगाव शहरात उभारलेले हृदेश हॉस्पिटल हे बोगस असल्याचा दावा निमा संघटनेनं केला आहे. वैद्यकीय व्यवसायाचा बनावट परवाना तयार करून हे रुग्णालय ज्ञानबा टेकाळे आणि माधव रसाळ या दोघांनी हे हॉस्पिटल तयार केल्याचा आरोप केला जात आहे.

एवढं मोठं रुग्णालय बोगस आहे हे या मुन्नाभाईच्या एका चुकीमुळे उघड झालं. कोणतेही रुग्णालय सुरू करायचं असेल तर डॉक्टरांना महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांच्याकडून अधिकृत परवाना घ्यावा




लागतो. या दोन मुन्नाभाईंनी हा परवानाच बनावट तयार केला आहे. इतका हुबेहूब परवाना तयार केला की चक्क आरोग्य अधिकाऱ्यांना सुद्धा यावर संशय आला नाही. परंतु या मुन्नाभाईंनी एक चूक केली ती म्हणजे परवान्याचा सिरीयल क्रमांक हा नऊ लाखापासून सुरुवात केला. इथेच मुन्नाभाईंचे बिंग फुटलं फुटले. डॉक्टरांच्या निमा संघटनेने यावर आक्षेप घेत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करत यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. डॉक्टर टेकाळे आणि डॉक्टर रसाळ या दोघांनी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिकल यांचे परवाना प्रमाणपत्र हे बनावट तयार केल्याचा आरोप कौन्सिलचे नोंदणी अधिकारी असलेले डॉक्टर दिलीप वांगे यांनी केला आहे. दिलीप वांगे राज्यभरातील सर्व डॉक्टरांना मेडिकल कौन्सिलचा परवाना देत असतात. या प्रकरणानंतर आम्ही प्रशासनाची ही भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता यावर कारवाई करण्याचे आश्वासन जिल्हा शल्यचिकित्सक राजेंद्र सूर्यवंशी यांनी दिले आहे. या दोन मुन्नाभाईंनी थाटलेल्या या रुग्णालयात शस्त्रक्रिया सुद्धा केली जाते. त्यामुळे अनेक रुग्णांच्या जीवाशी या ठिकाणी खेळ होत असल्याचं सांगत बनावट परवाना प्रमाणपत्र तयार करणारयांचा शोध घ्यावा अशी मागणी डॉक्टरांच्या वतीने करण्यात आली आहे

# कार चोरांसमोर पोलिसांनी आडवी गाडी घातली, चोरांचा चाकू हल्ला, महामार्गावर थरार

पिंपरी-चिंचवड : कार चोरी करून पळून जाणारे चोर आणि पोलिसांत जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर थरार झाल्याची घटना घडली आहे. शुक्रवारी (दि. 3 जून) रोजी रात्री 1 वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. चोरांना गाडी थांबवायला सांगितल्यानंतर त्यातील एकाने पोलिसांवर चाकूने वार केला. स्वतःला वाचवण्यासाठी पोलिसांनी त्या चोरांवर पिस्तुल रोखले, मात्र अंधाराचा फायदा घेत ते चोर शेजारी असणाऱ्या डोंगराळ भागात पळून जाण्यात यशस्वी ठरले. हा सर्व प्रकार पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील सोमाटने टोल नाका परिसरात घडला. ही सर्व घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी पोलीस कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांचे कौतुक केले आहे. नेमकं काय घडलं? याबाबत अधिक माहिती अशी की, निगडी परिसरातून एक चारचाकी गाडी चोरीला गेल्याची माहिती पोलिसांना समजली. त्यावेळी ड्युटीवर असणारे पोलीस कर्मचारी प्रदीप गट्टे आणि पोलीस अंमलदार निशांत काळे हे भक्ती शक्ती चौकात असताना त्यांना चोरीला गेलेली ती गाडी दिसली. त्यामुळे त्यांनी गाडीचा पाठलाग सुरू केला.

काही वेळ असाच प्रवास सुरू होता. देहू परिसरात मोठा ट्रक असल्याने चोरांनी गाडीचा वेग कमी केला. त्यावेळी पोलिसांनी त्या चोरांच्या गाडीला आपली गाडी आडवी लावली. त्यानंतर चोरीच्या गाडीची चावी काढण्याचा प्रयत्न करत असताना चोराने पोलिसांच्या हातावर चाकूने हल्ला केला.परिस्थिती लक्षात घेत पोलिसांनी त्या चोरांवर पिस्तुल रोखले. मात्र चोरांनी पोलिसांनी चकवा देत अंधाराचा फायदा घेत पलायन केले. पोलिसांनी काही अंतरापर्यंत त्यांचा पाठलाग केला, मात्र ते पळून जाण्याचा यशस्वी झाले. पोलिसांनी घटना स्थळावरून चोरीची गाडी आणि काही साहित्य जप्त केले आहे.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898